
ePaper

भारताचा पाकिस्तानला दणका, ट्रिब्युनलचा महत्वाचा निर्णय नाकारला!

| वर्ष - 8 | अंक - 319 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- देश माझ्या लेकीपेक्षा महत्त्वाचा
- वादग्रस्त निर्णय ऑस्ट्रेलियाच्या बाजूने
- डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर जपानचा संताप
- दहशतवादी हल्ल्याचा कट उद्ध्वस्त

www.mahaenews.com | शनिवार |, दि. 28 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### वातावरण चांगलेच तापले ! हिंदीच्या मुद्द्यावर 'महायुती' मध्ये मतभेद, अजितदादांची स्पष्ट भूमिका!

# एकनाथ शिंदेंची कोंडी!

## उद्धव - राज ठाकरे बंधू एका बाजूला, भाजपाची जी भूमिका, तीच शिंदे यांची !

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**महाराष्ट्रात सध्या हिंदी भाषा सक्तीच्या मुद्द्यावरून वातावरण चांगलेच तापले आहे. या महत्वपूर्ण मुद्द्यावर उद्धव आणि राज ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. मात्र, दुसरीकडे याच मुद्द्यावर 'महायुती' मध्ये मतभेद असल्याचे पाहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली असून दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मात्र कोंडी झालेली आहे.**



### ठाकरे बंधूंच्या मोर्चाचा बोलबाला

मराठीच्या समर्थनात आणि हिंदीला तीव्र विरोध करण्यासाठी राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने दि. ५ जुलै रोजी जाहीर केलेल्या मोर्चामध्ये सहभागी होण्याचा निर्णय उद्धव ठाकरे यांनी घेतला असल्याने त्यांच्या मनोमीलनाची आणि मोर्चाची सर्वत्र चर्चा आहे.

### भाजप-शिंदे गटाची भूमिका एकच

दरम्यान, महाराष्ट्रात हिंदीची सक्ती नाही, तर मराठीची सक्ती आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे, तरीही ठाकरे बंधूंनी आडमुठी भूमिका घेऊन मोर्चाचा निर्णय घेतला आहे, असे भाजपाचे नेते म्हणत आहेत.

### अनिवार्य शब्द हटवला

फडणवीस यांनी स्पष्ट सांगितले आहे, की अनिवार्य असा शब्द आम्ही हटवला आहे. ही माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. मात्र, दुसरीकडे पहिली ते चौथी हिंदी नकोच, अशी थेट भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतली आहे. अजित पवार यांच्या या भूमिकेमुळे 'महायुती' मध्ये जोरदार मतभेद झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे भाजपा बरोबर आता एकनाथ शिंदे यांची ही कसोटी आहे. सरकारमध्ये असून अजित पवार यांचा हिंदीला विरोध आहे.

### काय म्हणाले अजित पवार

अजितदादा यांनी म्हटले आहे, की देवेंद्र फडणवीस यांनी बैठक घेतली. मला असे वाटते की पहिली, दुसरी, तिसरी, चौथीमध्ये हिंदी असू नये. पाचवीपासून हिंदी असावे. पहिलीपासून मराठी भाषाच असावी, पहिलीतील मुलांना मराठी शिकवावी. ज्यावेळी ते पहिलीपासून मराठी भाषा लिहायला आणि वाचायला शिकतात, तेव्हा त्यांना हिंदी भाषा देखील लिहिता वाचता येते. फक्त बोलण्याच्या संदर्भात पाचवीपासून सुरुवात केली, तरी काही हरकत नाही. तेव्हा पाचवीपासून हिंदी सक्तीची करावी, असे त्यांचे म्हणणे आहे.

### शिंदे काय म्हणाले?

दुसरीकडे यावर आक्षेप घेणाऱ्यांशी बोलून निर्णय घेऊ, अनिवार्य शब्द काढला आहे, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. त्यामुळे शिंदे यांची भूमिका ही भाजपला सुसंगत अशीच आहे. या सर्व घडामोडींवर एकनाथ शिंदे यांचे मंत्री दादा भुसे यांनी राज ठाकरे यांची देखील भेट घेतल्याचे पाहायला मिळाले. मात्र, या संदर्भात अजित पवार यांची वेगळी भूमिका असल्याचे पाहायला मिळत आहे.

### पवारांचा मोर्चाला पाठिंबा

राज ठाकरे यांच्या मोर्चाच्या आवाहनावर सुरुवातीला शंका घेणाऱ्या शरद पवार यांनी मात्र आता मोर्चाला पाठिंबा देण्याचे ठरवले आहे. त्यांनी पाठिंबा जाहीर केला तसेच काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनीही पाठिंबा जाहीर केला आहे.

### खोत यांचा हल्लाबोल...

हिंदी भाषेच्या सक्तीविरोधात येत्या दि. ५ जुलैला महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना- ठाकरे गटाच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चासंदर्भात विविध प्रतिक्रिया येत आहेत. मुंबईत होणाऱ्या या आंदोलनासाठी राज आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार आहेत. मात्र, यावरुनच शेतकरी नेते सदाभाऊ खोत यांनी दोघा भावांना फटकारले आहे. सदाभाऊ खोत यांची ही भूमिका म्हणजे भाजपाची भूमिका आहे, असा टोला विरोधकांनी लगावला आहे. त्यांच्या तोंडून भाजपा बोलत आहे की काय, असे विरोधकांचे म्हणणे आहे.

### मराठी धोक्यात नाही, खुर्च्या धोक्यात..

मराठी भाषा धोक्यात आली नाही, तर यांच्या खुर्च्या धोक्यात आल्या आहेत, अशी टीका खोतांनी केली आहे. मोर्चे काढणारे आणि त्यांची लेकरे कोणत्या शाळेत शिकले? त्या शाळांची नावे आम्हाला सांगा, असा प्रश्न खोत यांनी उपस्थित केला आहे. सदाभाऊ खोत यांनी ठाकरे बंधूंना फटकारले.

### ढोंगीपणा बास झाला..

मराठी भाषेवर आक्रमण हा ढोंगीपणा आहे. माझ्या लेकराला हिंदी, इंग्रजी आले पाहिजे, कारण मला जगाबरोबर चालायचे असेल तर ती भाषा आली पाहिजे, असे खोत म्हणाले.

### खोतांचा ठाकरेंना सवाल..

आमच्या लेकरांना हिंदी, इंग्रजी आले नाही पाहिजे, याचे कारण म्हणजे यांच्या विचाराचे दारिद्र्य आहे. आमची पोरे अडाणी असली पाहिजेत म्हणजे त्यांना जग समजता कामा नये, असे म्हणत खोतांनी विरोधकांवर टीका केली. जग केवळ यांना समजता आले पाहिजे. जे आज आंदोलन करत आहेत, त्यांना माझा साधा प्रश्न तुमच्या लेकरांना इंग्रजी येते का? विमानात बसल्यावर तुमची मुलं इंग्रजीत बोलतात ना? तुमची लेकरं कोणत्या मराठी भाषेत शिकली, त्यांची नावे आम्हाला सांगा?

### हिंदी सक्तीचा आदेश उद्धव ठाकरे यांच्या काळातील..

ज्या हिंदी सक्तीच्या आदेशावरून सध्या रान पेटले आहे तो आदेश उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री असताना काढण्यात आला होता आणि त्यावेळी काँग्रेस पक्ष तसेच शरद पवारांचा पक्षही त्यांच्या पाठीशी खंबीर होता अशी माहिती शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांनी दिली. हिंदीची कोणतीही सक्ती नाही तरीही मोर्चा काढण्या मागचे प्रयोजन काय, असा प्रश्न विचारून अनेक नेत्यांनी म्हटले आहे की 'फेक नॅरेटिव्ह' पसरवून मतदारांची सहानुभूती मिळवण्याचा हा केविलवाणा प्रयत्न सुरू आहे.

# पुणे-नाशिक महामार्गावर कोंडी कायम!

## अतिक्रमणे, विविध कामांमुळे वाहतुकीसह उद्योगांवर परिणाम

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे-नाशिक महामार्गावर रस्त्याच्या कडेला असलेली अतिक्रमणे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) हटवूनही या रस्त्यावरील वाहतूक कोंडी कायम असल्याचे चित्र आहे. तसेच, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून (एनएचएआय) रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्याने प्रवासी वाहनांबरोबरच शेती मालाची वाहतूक करणारे व्यापारी, शेतकरी, औद्योगिक कंपन्यांसाठी माल वाहतूक करणारी वाहने महामार्गावर अडकून पडत आहेत.**



उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या ‘राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६०’मुळे पुणे-नाशिक या दोन शहरांतील प्रवासाचा कालावधी कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढत चालला आहे. उत्तर महाराष्ट्रातून येणारी वाहने चाकण औद्योगिक वसाहतीमार्गे मुंबई, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर मार्गावर जातात. पुण्यामध्ये तळेगाव, चाकण आणि रांजणगाव या ठिकाणी मोठ्या औद्योगिक कंपन्या आहे. तसेच, शेतमालासाठी मार्केट यार्ड, कृषी उत्पन्न बाजार समिती असल्याने या मार्गावरून कंपन्यांच्या कच्चा मालाची आणि शेतमालाची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असते. या मार्गावर वाहतूक कोंडी होत असल्याने त्याचा फटका औद्योगिक कंपन्या, शेतमाल वाहतुकीला बसत आहे. खेड ते सिन्नरपर्यंत रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. तसेच, तळेगाव, चाकण परिसरातील महामार्गालगत उभा राहणाऱ्या पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बस, खासगी कंपन्यांच्या बस, उलट्या दिशेने होणारी वाहतूक, तळेगाव चौकात अनधिकृत रिक्षा थांबे, रस्ता दुभाजक नसल्याने बिनदिक्कत रस्ता ओलांडणारे वाहनचालक अशा अनेक कारणांमुळे अपघाताची परिस्थिती निर्माण होत आहे. परिणामी नियमित वाहतुकीवर परिणाम होत असून वाहनचालकांना नियोजित ठिकाणी पोहचण्यास विलंब होत आहे.कंपन्यांमध्ये होणाऱ्या कच्च्या मालाची वाहतूक विस्कळित होत असल्याने औद्योगिक वसाहतीवर परिणाम झाला आहे. कामगारांना येण्या-जाण्यासाठी असलेली वाहने वाहतूक कोंडीत अडकल्याने कामगारांना कंपन्यांमध्ये पोहोचण्यास विलंब होत आहे. यामुळे कंपन्यांपुढे गंभीर समस्या निर्माण झाली असून, चाकणला पर्यायी मार्ग म्हणून बायपास तयार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. वाहतूक पोलिसांना निवेदन दिल्यानंतरही वाहतूक कोंडी कायम आहे. उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या ‘राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६०’मुळे पुणे-नाशिक या दोन शहरांतील प्रवासाचा कालावधी कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढत चालला आहे. उत्तर महाराष्ट्रातून येणारी वाहने चाकण औद्योगिक वसाहतीमार्गे मुंबई, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर मार्गावर जातात.

### अनेक कारणांमुळे अपघात

शेतमालासाठी मार्केट यार्ड, कृषी उत्पन्न बाजार समिती असल्याने या मार्गावरून कंपन्यांच्या कच्चा मालाची आणि शेतमालाची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असते. या मार्गावर वाहतूक कोंडी होत असल्याने त्याचा फटका औद्योगिक कंपन्या, शेतमाल वाहतुकीला बसत आहे. खेड ते सिन्नरपर्यंत रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. तसेच, तळेगाव, चाकण परिसरातील महामार्गालगत उभा राहणाऱ्या पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बस, खासगी कंपन्यांच्या बस, उलट्या दिशेने होणारी वाहतूक, तळेगाव चौकात अनधिकृत रिक्षा थांबे, रस्ता दुभाजक नसल्याने बिनदिक्कत रस्ता ओलांडणारे वाहनचालक अशा अनेक कारणांमुळे अपघाताची परिस्थिती निर्माण होत आहे.

# पुण्यातील कर्करोग रुग्णालयाचं अखेर ठरलं!

## ससून रुग्णालयाशेजारील ‘एमएसआरडीसी’च्या जागेवरच उभारणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यात स्वतंत्र कर्करोग रुग्णालयाच्या उभारण्याचा प्रस्ताव आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची (एमएसआरडीसी) ससून सर्वोपचार रुग्णालयाशेजारील जागा यासाठी योग्य आहे. ही जागा कर्करोग रुग्णालयासाठी देण्याची तयारी ‘एमएसआरडीसी’ने दर्शविली आहे. त्यामुळे लवकरात लवकर जागेचा प्रश्न मार्गी लावून कर्करोग रुग्णालयाच्या उभारणीला गती दिली जाईल, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली.**



ससून सर्वोपचार रुग्णालयात वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री मिसाळ यांनी शुक्रवारी आढावा बैठक घेतली. बैठकीला आमदार बापू पठारे, हेमंत रासने, ससूनचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार उपस्थित होते. या बैठकीनंतर बोलताना मिसाळ म्हणाल्या, ‘ससूनचा स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव आहे. ‘एमएसआरडीसी’ची ससूनशेजारील जागा यासाठी योग्य आहे. परंतु, ही जागा मधल्या काळात एका विकसकाला भाडेतत्त्वावर दिली गेली. ही जागा कर्करोग रुग्णालयाला मिळावी, असा प्रस्ताव ‘एमएसआरडीसी’ला पाठविण्यात आला.

यावर त्यांनी जागा देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे ही जागा लवकरच ताब्यात मिळून कर्करोग रुग्णालय उभारणी सुरू होण्याची अपेक्षित आहे.’ससूनमध्ये केवळ पुणे जिल्ह्यातूनच नव्हे, तर राज्यभरातून रुग्ण उपचारांसाठी येतात. रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने रुग्णालयावर ताण वाढला आहे. रुग्णालयातील ११ मजली इमारतीत ५२० नवीन रुग्णशय्यांना मंजुरी देण्याचा प्रस्ताव आहे. याचबरोबर रिक्त पदांची संख्याही जास्त असून, ती भरण्यासाठी पावले उचलली जाणार आहेत. रुग्णालयात एमआरआय, सीटी स्कॅन आणि कॅथलॅब या अत्याधुनिक निदान सुविधांमध्ये वाढ करण्यात येईल, असेही मिसाळ यांनी स्पष्ट केले. ससून रुग्णालयाच्या आवारातील अस्वच्छतेवर राज्यमंत्री मिसाळ यांनी ताशेरे ओढले. त्या म्हणाल्या, की रुग्णालयाच्या आवारासह विद्यार्थी वसतिगृहांमध्ये पुरेशी स्वच्छता नाही. अपुरे मनुष्यबळ असून, असलेले मनुष्यबळही पूर्ण क्षमतेने कामावर येत नसल्याची रुग्णालय प्रशासनाची तक्रार आहे. अपुऱ्या मनुष्यबळाची समस्या सोडविण्यात येणार आहे. स्वच्छतेच्या बाबतीत रुग्णालय प्रशासनाने योग्य ती खबरदारी घ्यावी.ससून सर्वोपचार रुग्णालयात वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री मिसाळ यांनी शुक्रवारी आढावा बैठक घेतली. बैठकीला आमदार बापू पठारे, हेमंत रासने, ससूनचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार उपस्थित होते. या बैठकीनंतर बोलताना मिसाळ म्हणाल्या, ‘ससूनचा स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव आहे.

### अस्वच्छतेवर ताशेरे

‘एमएसआरडीसी’ची ससूनशेजारील जागा यासाठी योग्य आहे. परंतु, ही जागा मधल्या काळात एका विकसकाला भाडेतत्त्वावर दिली गेली. ही जागा कर्करोग रुग्णालयाला मिळावी, असा प्रस्ताव ‘एमएसआरडीसी’ला पाठविण्यात आला. यावर त्यांनी जागा देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे ही जागा लवकरच ताब्यात मिळून कर्करोग रुग्णालय उभारणी सुरू होण्याची अपेक्षित आहे.

## बेदरकार वाहन चालकांमुळे अपघात वाढले

# चाकण परिसराला वाहतूक कोंडीचा फास!

## उपाय योजना कागदावर; अंमलबजावणी शून्य

। चाकण ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चाकण आणि परिसरात असणाऱ्या कारखानदारीने बेसुमार वाढलेली वाहनांची संख्या,अपुरे रस्ते,सततची वाहतूक कोंडी,बेदरकार वाहनचालक, प्रशासन आणि प्रशासकांची सुरू असलेली गळचेपी भूमिका आणि वाहतूक पोलिसांच्या दुर्लक्षामुळे चाकणच्या मार्गावर रोज होणाऱ्या जीवघेण्या अपघातात एक तरी बळी जातोय तर एखादा कायमचा जायबंदी होत आहे. मात्र कोणत्याही राजकीय पुढाऱ्याला लक्ष द्यायला वेळ नाही. त्यामुळे मतांसाठी दारोदार फिरणारे लोकप्रतिनिधी आहेत तरी कुठे ? असा संतप्त सवाल नागरिक विचारात आहेत.**




चाकण शहरातून जाणाऱ्या महामार्गावरील तळेगाव - चाकण,पुणे - नाशिक मार्गासह आंबेठाण रस्ता आणि औद्योगिक क्षेत्रातील प्रत्येक रस्त्यांवर वाहतुक कोंडीचा प्रश्न दररोज भेडसावतो आहे.परंतु,त्यावर तोडगा काढण्यात राजकीय नेते,प्रशासन,पोलिस खात्याला अपयश आले आहे.तास अर्धा तास जागेवर वाहने उभे राहत असल्याने इंधन,वेळ वाया जात आहे.पुणे- नाशिक महामार्गावर तसेच चाकण -तळेगाव, चाकण- शिक्रापूर मार्गावर सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. चाकणला वाहतूक कोंडीचे ग्रहण हे लागले आहे. हे ग्रहण काही सुटत नाही अशी भयानक अवस्था आहे. वाहनांच्या अगदी एक, दोन किलोमीटर रांगा लागत आहे. त्यामुळे नागरिक,प्रवाशी,कामगार, विद्यार्थी सारेच संतप्त झाले आहेत.

सकाळ पासूनच पुणे नाशिक महामार्गावर दुतर्फा वाहनांच्या सुमारे एक ते तीन किलोमीटर रांगा लागलेल्या असतात,कोंडीत सापडलेली वाहतूक सुरळीत करताना वाहतूक पोलीस कर्मचारी व त्यांना सहाय्य करणारे ट्राफिक वार्डन यांची तारांबळ उडते . पुणे नाशिक महामार्गावर स्पाईन रोड सिग्नल पासून, मोशी चौक,भारत माता चौक चिंबळी मोई फाटा, कुरळी फाटा स्पायसर चौक,आंबेठाण चौक( संत सावता माळी चौक) वाकी रोहकल फाटा या चौकात सिग्नलला वाहतुकीच्या लांबच्या लांब रांगा लागलेल्या असतात.

### वाहतूक कोंडी आणि वाहतूक पोलीस

चाकण आणि औद्योगिक वसाहतीत वाहतूक नियमन सुरळीत होण्यासाठी चाकण वाहतूक शाखेतून महाळुंगे वाहतूक शाखा वेगळी करण्यात आली.परंतु वाहतूक कोंडी जैसे थै च राहिली आहे.वाहतूक नियमन करण्यात चाकण आणि महाळुंगे वाहतूक शाखा फेल झाल्या असल्या तरी दंड वसुलीमध्ये एक नंबरवर असल्याचे काही पोलीस कर्मचारी खासगीत बोलून दाखवत आहेत.

दरम्यान, दिवसेंदिवस वाढणाऱ्या वाहतूक समस्येकडे विकासकामांचे फ्लेक्स लावून श्रेय लाटणाऱ्या राजकीय नेत्यांना लक्ष द्यायला वेळ नाही,अशी टीका नागरिकांनी केली आहे.

सन २०१४ मध्ये नाशिक फाटा ते चांडोली, राजगुरूनगरपर्यंतच्या महामार्गाचे सहापदरीकरण मंजूर करण्यात आले होते.त्याला पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या तत्कालीन कारभाऱ्यांनी विरोध केला.परिणामी हा प्रकल्प लांबला. वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी नाशिक फाटा ते चांडोली आणि चाकण ते तळेगाव एलिव्हेटेड कॉरिडॉर म्हणजे दुमजली रस्ता करण्याच्या घोषणा झाल्या आहेत.मात्र प्रत्यक्षात कामाला सुरुवात कधी होणार आहे.हे कुणी स्पष्ट सांगत नाही.तोपर्यंत वाहतूक कोंडीची समस्या अशीच राहणार का?असा प्रश्न उपस्थित होत आहे. चाकण औद्योगिक पट्ट्यामुळे या भागातील लोकसंख्या आणि वाहने वाढली आहेत. त्यामुळे सध्याचा चौपदरी रस्ता अगदीच अपुरा पडत आहे. या भागात आणखी काही कंपन्या येणार आहेत. तसेच त्या पाठोपाठ अनेक मोठे गृहप्रकल्प होऊ घातले आहेत. एमआयडीसीचा पाचवा टप्पा पूर्णत्वाच्या मार्गावर आहे.त्यानंतर या समस्येत आणखीनच भर पडण्याची शक्यता आहे.त्यामुळे महामार्गांचे काम होणे काळाची गरज आहे.

# हिंजवडीचा समावेश पीसीएमसीमध्ये व्हावा!

## माजी विरोधी पक्षनेते नाना काटे : सर्वांगीण विकासासाठी आता ठोस पावले उचलण्याची गरज

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडीसारख्या अत्यंत वेगाने विकसित होणाऱ्या माहिती तंत्रज्ञान केंद्राच्या सर्वांगीण विकासासाठी आता ठोस पावले उचलण्याची गरज आहे, असे मत चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "हिंजवडीचा समावेश पिंपरी-चिंचवड महापालिकेत झाला पाहिजे!".**



हिंजवडी परिसरातील रस्त्यांची दयनीय अवस्था, माहिती तंत्रज्ञान उद्यानात होणारी प्रचंड वाहतूक कोंडी, अपुऱ्या नागरी सुविधा आणि अनियोजित वाढ यामुळे आयटी कर्मचारी, स्थानिक रहिवासी तसेच उद्योजक वर्ग हैराण झाले आहेत. या सगळ्याचा थेट परिणाम परिसरातील जीवनमानावर होत आहे.


या पार्श्वभूमीवर वाकड-पिंपरी चिंचवड रहिवासी विकास व कल्याण संघाचे अध्यक्ष श्री. सचिन लोंढे यांनी #UNCLOGHinjawadiITPark या नावाने जनआंदोलन सुरू केले असून, हिंजवडीचा पीसीएमसीमध्ये समावेश व्हावा, यासाठी ऑनलाईन स्वाक्षरी अभियान चालवले जात आहे. या अभियानास अल्पावधीतच हजारोंचा प्रतिसाद मिळत आहे.

रस्त्यांची तातडीने दुरुस्ती व देखभाल, वाहतूक व्यवस्थापनात सुधारणा, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छता यासारख्या नागरी सुविधा अधिक सक्षम, आयटी कर्मचारी व स्थानिक रहिवाशांना दिलासा, एकूणच या भागाचा नियोजनबद्ध व शाश्वत विकास.

### अभियानामध्ये सहभाग नोंदवा...

नाना काटे यांनी या मागणीला ठाम पाठिंबा दिला असून नागरिकांनाही पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे. "आपल्या एका स्वाक्षरीमुळे हिंजवडीच्या उज्ज्वल भविष्यास चालना मिळू शकते. नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा असे काटे यांनी म्हणाले. हिंजवडीच्या नागरी हक्कांसाठी ही लढाई फक्त आयटी कर्मचाऱ्यांची नाही, तर संपूर्ण परिसराच्या भल्याची आहे. अधिक सुविधा, शाश्वत विकास आणि जीवनमानात सुधारणा हाच यामागचा मुख्य हेतू आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### शाश्वतचे सुख कसे लाभेल ?

असे पहा, एखादा प्रवचन करणारा घ्या, किंवा मोठा वैदिक कर्मे करणारा घ्या; त्याला त्यापासून समाधान मिळते असे नाही, तो असमाधानातच असतो. कळू लागल्यापासून आपण सदाचाराने वागत असून आणि देवधर्म करीत असूनही आपल्याला समाधान लाभत नाही, याचे कारण काय ? तर आपले ध्येय निश्चित झालेले नसते. आपण नीतीने वागतो ते लोकांच्या भीतीने; कारण आपण वाईट वागलो तर लोक आपल्याला नावे ठेवतील. लौकिकासाठी केलेले कर्म कधीही समाधान देऊ शकत नाही. पापकर्म करणाऱ्यालाही समाधान लाभत नाही, कारण त्यालासुद्धा आपण करतो हे वाईट आहे असे वाटतच असते. एकदा एक गृहस्थ माझ्याकडे आला आणि म्हणाला, " देवापाशी काही न्याय नाही; तो अगदी अन्यायी आहे. " मी त्याला विचारले, " असे झाले तरी काय ? " त्यावर तो म्हणाला, " मी कधी कोणाचा पैसा खाल्ला नाही, सदाचरणाने वागलो; पण मी फक्त एकमजली घर बांधू शकलो, आणि माझ्या हाताखाली काम करणाऱ्या एका भिकारड्या कारकुनाने पैसा खाऊन माझ्या घरासमोर दुमजली घर बांधले!" मी त्याला विचारले, " मग तुम्ही का नाही पैसा खाल्ला ? " त्यावर तो म्हणाला, " मला तसे आवडत नाही; लोक नावे ठेवतील. "तेव्हा, जे कर्म लौकिकासाठी केले त्याने कधीही समाधान मिळू शकणार नाही. प्रपंचात सुख लाभावे म्हणून आपण देवाचे करतो, आणि लौकिकासाठी नीतिधर्माने वागतो; मग त्यातून शाश्वतचे सुख कसे लाभेल ? अंगावर चांगले दागिने घातले, उत्तम लुगडे नेसले, परंतु कुंकू जर कपाळाला नसेल तर या सर्वांची काय किंमत ? तसेच, जर देवाचे प्रेम नसेल तर त्या सत्कर्मापासून तितकासा उपयोग होणार नाही. याउलट, देवाच्या ठिकाणी अत्यंत प्रेम असूनसुद्धा जर नीतिधर्माचे आचरण नसेल, तर ती परमार्थाची इमारत टिकू शकणार नाही.

खरोखर परमार्थ अत्यंत सोपा आहे, विद्वान् लोक तो उगीचच अवघड करून सांगतात. चांगले काय आणि वाईट काय हे कळायला लागल्यापासून जो त्याप्रमाणे वागेल त्याला खात्रीने परमार्थ साधेल. परमार्थ तीनपैकी कोणत्याही एका गोष्टीने साधू शकेल : एक, देहाने साधूची संगत; दुसरी, संतांच्या वाङ्मयाची संगत आणि त्याचप्रमाणे पुढे आचरण; आणि तिसरी, भगवंताचे नामस्मरण. नाम घेतल्याने त्याची संगत आपल्याला अखंड लाभू शकेल. संतांनी सांगितले ते संशय न घेता विश्वासाने करणे ही पहिली पायरी, आणि ते पुढे निश्चयाने, श्रद्धेने, आणि प्रेमाने चालू ठेवणे ही शेवटची पायरी. हाच शाश्वत समाधानाचा मार्ग आहे.

**बोधवचन:- जग काय म्हणेल म्हणून वागणे याचे नाव व्यवहार; भगवंत काय म्हणेल म्हणून वागणे याचे नाव परमार्थ.**



‘स्टेट’मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# महा भयानक कट-कारस्थान, भारताच्या इस्लामीकरणाचा!



**भारताचे २०४७ पर्यंत पूर्ण इस्लामीकरण करण्याचे कट-कारस्थान शिजत आहे. पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) कडून हा मोठा कट रचला जात असून तपासामध्ये ते उघडही झाले आहे.**

### अनेक देशद्रोही गोष्टींचा उलगडा..

तपास यंत्रणांच्या तपासात अनेक बारीक सारीक गोष्टी पुढे आल्या आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक श्रीनिवासन यांच्या हत्येप्रकरणी तपास यंत्रणेने न्यायालयात हा खुलासा केला असून पुरावे देखील सादर केले आहेत. गेल्या पंधरवड्यात दि. ११ जून रोजी ‘एनआयए’ च्या एर्नाकुलम न्यायालयाने महम्मद बिलाल, रियाउशद्दीन आणि इतर आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला होता. हे सर्वजण श्रीनिवासन यांची निर्घृण हत्या झाली होती, त्या प्रकरणात आरोपी आहेत. या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या राष्ट्रीय तपास यंत्रणेने न्यायालयात खूपच धक्कादायक गोष्टी मांडल्या आहेत, त्या ऐकून न्यायालयात नव्हे तर संपूर्ण देश हादरला आहे.

### ‘पीएफआय’चा देश पोखरण्याचा कट..

या प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी ‘एनआयए’ ने न्यायालयाला सांगितलेल्या अनेक बाबी नुसत्या धक्कादायक नव्हत्या तर पायाखालील वाळू सरकणाऱ्या होत्या. बंदी घातलेल्या ‘पीएफआय’ या संघटनेचे सदस्य आणि अधिकारी गेल्या अनेक वर्षांपासून एका मोठ्या कटाचे नियोजन करत होते आणि त्यात सहभागी होते. त्यांचा मुख्य उद्देश २०४७ पर्यंत देशात दहशत पसरवणे, सांप्रदायिक तणाव वाढवणे आणि भारतात इस्लामिक राजवट लादणे हा आहे, असे न्यायालयात स्पष्ट झाले.

### दहशतवादी संघटनांशी संबंध..

‘एनआयए’ च्या मते, ‘पीएफआय’ चे सदस्य यापूर्वी सिमीसारख्या बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनांशी संबंधित होते. त्यांचे लष्कर-ए-तोयबा, आयसिस आणि अल-कायदासारख्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांशीही संबंध आहेत. संघटनेचे अनेक कार्यकर्ते या दहशतवादी संघटनांचे सदस्य सुद्धा होते आणि त्या संघटनांच्या इशाऱ्यावर ही दहशतवादी संघटना काम करीत आहे.

### कारस्थाने आणि जातीय तणाव पसरवणे..

केरळसह देशाच्या अनेक भागात ‘पीएफआय’ च्या कार्यकर्त्यांनी अनेक ठिकाणी हिंसाचार आणि खून केले आहेत. वेगवेगळी कारस्थाने रचून जातीय तणाव कसा पसरेल, हे पाहिले जाते आणि त्यांच्याकडून घडवून आणले जाते. ‘एनआयए’ चा दावा आहे की, पीएफआय संघटना केवळ दहशत पसरवण्याचा प्रयत्न करत नव्हती, तर देशाचे संविधान आणि लोकशाही संपवून नवीन इस्लामिक संविधान लागू करण्याची योजना देखील आखत होती. त्याच्या योजनेचे चार टप्पे होते, आणि त्या मार्गाने हे कारस्थान रचले जात होते.

### कटाचा पर्दाफाश..चार टप्पे!

या संपूर्ण कटाचा पर्दाफाश करण्यात आला असून त्याचे चार टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यात, मुस्लिम समुदायाला एकाच झेंड्याखाली आणायचे होते. त्यानंतर ‘एसडीपीआय’ नावाच्या राजकीय पक्षाच्या माध्यमातून दलित, मागासवर्गीय आणि अल्पसंख्याकांना एकत्र करून निवडणुका जिंकायच्या होत्या. त्यानंतर, समाजात फूट निर्माण करून हळूहळू सत्तेत घुसायचे होते. अंतिम टप्प्यात, ‘एसडीपीआय’ ला संपूर्ण मुस्लिम समुदायाचे प्रतिनिधी बनवण्याची आणि इतर मुस्लिम संघटनांना बाजूला ठेवण्याची योजना होती. या सर्वांचे अत्यंत काटेखोर असे नियोजन होते आणि अंमलबजावणीची तयारी सुरू होती, हेदेखील निष्पन्न झाले आहे.

### कोर्ट, सैन्य आणि पोलीस खाते ताब्यात..

यानंतर, ‘पीएफआय’ ची योजना न्यायपालिका, सैन्य आणि पोलिसांमध्ये आपल्या निष्ठावंत लोकांना घुसवून विरोधकांना संपवण्याची आणि शस्त्रास्त्रांचा साठा करून देशात इस्लामिक कायदा लागू करण्याची होती. ‘एनआयए’ तर्फे सांगितले गेले, की त्यांची एक विशेष रिपोर्टर विंग आणि सर्व्हिस विंग होती. रिपोर्टर विंग परिसरातील हिंदू नेत्यांची तपासणी करत असे आणि एक यादी तयार करत असे, ज्यामधून ‘टार्गेट’ निवडले जात असे आणि सर्व्हिस विंगद्वारे त्यांची हत्या केली जात असे. श्रीनिवासन यांची हत्या देखील या कटाचा एक भाग होती, हे देखील निष्पन्न झाले आहे.

### श्रीनिवासन यांची हत्या कशासाठी?

‘एनआयए’ च्या मते श्रीनिवासन यांची हत्या ही अचानक झालेली घटना नव्हती, तर एक सुनियोजित दहशतवादी हल्ला होता. श्रीनिवासन त्यांच्या निशाण्यावर असल्याने त्यांना ठार मारण्यात आले. पूर्ण तयारीनंतर, संधी मिळताच त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या वर्षी मार्चमध्ये ‘ईडी’ने ‘एसडीपीआय’चे प्रमुख एम.के. फैजी यांना अटक केली होती. ते या संपूर्ण कटातील एक महत्त्वाचा दुवा मानले जात आहेत. एकंदरीत, ‘एनआयए’ ने न्यायालयात सादर केलेल्या तथ्यांवरून असे दिसून येते की, ‘पीएफआय’ एका देशद्रोही आणि दहशतवादी कटात सहभागी होती. त्यांचा उद्देश केवळ एका व्यक्तीला मारणे नव्हे, तर संपूर्ण देशाची लोकशाही व्यवस्था नष्ट करणे हा होता आणि ते आता लपून राहिलेले नाही.

### मोदी सरकारपुढे आव्हान..

भारताला इस्लामिक देश बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या अनेक संघटना भारतात सक्रिय आहेत. अनेक मदरशांमध्ये दहशतवादी तयार करण्याचे कारखाने सुरू आहे. त्यामुळे भारताचे सार्वभौमत्व अबाधित राहावे आणि भारताचे इस्लामीकरण होणार नाही, याची दक्षता घेण्याचे मोठे आव्हान केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारपुढे आहे. कोर्टात मांडली गेलेली वस्तुस्थिती नक्कीच केंद्र सरकारची डोकेदुखी असून त्यासाठी केंद्राची सकारात्मक पावले देखील पडत आहेत, हे निश्चित !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कृषी, वने, मत्स्य व्यवसायात वाढ!

## » भंडाऱ्यामध्ये उद्योगांना चालना देण्याची गरज

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**पूर्व विदर्भातील सिंचनवृद्धीच्या दृष्टीने भंडारा हा महत्वाचा जिल्हा आहे. जिल्ह्यात सिंचनवाढीसोबतच मत्स्य शेती, पशू संवर्धन तसेच कृषीपूरक व्यवसायांमध्ये वाढ झाली असली तरी खाण, बांधकाम आणि उद्योग क्षेत्रात मात्र भंडारा इतर जिल्ह्यांच्या तुलनेत पिछाडीवरच आहे. जिल्ह्यात १२३ नोंदणीकृत कारखान्यांपैकी ६३.४१ टक्के कारखाने सुरू आहेत. त्यामुळे औद्योगिकीकरण आणि कारखाने यात जिल्हा मागासलेला आहे. कामगारांची संख्या ९ हजार ५६० आहे. जिल्ह्यात वन आणि जलपर्यटनासाठी प्रचंड वाव असून यातून मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होऊ शकते. मात्र प्रबळ राजकीय इच्छाशक्तीअभावी ही बलस्थाने अजूनही पाहिजे त्या प्रमाणात उभारी घेऊ शकली नाहीत.**



भंडारा जिल्ह्यात भात हे मुख्य पीक आहे. २०२४ मध्ये भाताचे उत्पादन ४३९३.७३ मेट्रिक टन असून आधीच्या वर्षीच्या तुलनेत १३.९७ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. ऊस, गहू, सोयाबीन, हरभरा, जवस या पिकांच्या उत्पादनातही वाढ झालेली आहे. याउलट तूर, मूग, उडीद, तीळ, कापूस या पिकांचे उत्पादन घटले आहे.नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, कोका अभयारण्य, नवीन नागझिरा, पवनी- उमरेड- कन्हांडला येथून जंगल सफारीसाठी हजारो पर्यटक दरवर्षी येतात. यातून लाखोंची उलाढाल होते. जिल्ह्यात अस्थायी असलेले १४०३.६२ चौ.किमी. वनक्षेत्र हे जिल्ह्यातील एकूण भौगोलिक क्षेत्रफळाच्या ३४.३४ टक्के आहे. विशेष म्हणजे २०20 ते २०२४ या चार वर्षांच्या कालावधीत वन उत्पादनापासून जिल्ह्याच्या उत्पन्नात तब्बल ४३ टक्क्यांची वाढ झाली.कर्ज वितरणात होणारी वाढ आर्थिक सर्वसमावेशकतेसाठी पोषक वातावरणनिर्मिती करते. मात्र भंडाऱ्यात याउलट परिस्थिती आहे. ५६ ठिकाणी ११४ बँक शाखा आहेत. या वर्षी ९८०० कोटी रुपयांच्या ठेवी असून २६६९ कोटी रुपयांचे कर्जवाटप झाले आहे. यात ११५२ कोटी रुपयांचे कृषीकर्ज आहे. असे असले तरी जिल्ह्यात मुद्रा कर्जांतर्गत केवळ ५५ हजार ९४२ लाभार्थ्यांना ४०१.५६ कोटी रुपये कर्ज मंजूर करण्यात आले आहे.जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण ८३.७६ टक्के असून राष्ट्रीय साक्षरतेच्या (७४.०४ टक्के) प्रमाणापेक्षाही अधिक आहे.भंडारा जिल्ह्यात भात हे मुख्य पीक आहे. २०२४ मध्ये भाताचे उत्पादन ४३९३.७३ मेट्रिक टन असून आधीच्या वर्षीच्या तुलनेत १३.९७ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. ऊस, गहू, सोयाबीन, हरभरा, जवस या पिकांच्या उत्पादनातही वाढ झालेली आहे. याउलट तूर, मूग, उडीद, तीळ, कापूस या पिकांचे उत्पादन घटले आहे.२०२४ अखेर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाचे १४२०.२२ कि.मी. व जिल्हा परिषदेचे ४८८५.७३ कि.मी. लांबीचे रस्ते असून नगरपालिकेच्या हद्दीतील ६३७.७५ कि.मी. लांबीचे रस्ते आहेत.मागील वर्षी १०० खाटांचे शासकीय वैद्याकीय महाविद्यालय व रुग्णालय मंजूर झाले असून वैद्याकीय सेवेत वाढ झाल्यामुळे मृत्युदरात घट झाल्याचे दिसून येते. असे असले तरी मुलांच्या तुलनेत मुलींचा जन्मदर कमी आहे. बालमृत्यूंची संख्या १५३, तर अर्भक मृत्यूंची संख्या १२५ इतकी नोंदवण्यात आली आहे.

### भात पिक उत्पादनात वाढ

दुसरीकडे स्थापनेच्या दशकपूर्तीनंतरही गोंडवाना विद्यापीठाला लय सापडलेली दिसत नाही.नक्षलवादी कारवाया गेल्या तीन वर्षांत कमी झाल्या आहेत. विविध दलांतील कार्यरत पाच हजारांहून अधिक जवान, १७ पोलीस ठाणे आणि ४५ पेक्षा अधिक दुर्गम भागात कार्यरत पोलीस मदत केंद्रे व पथके या माध्यमातून नक्षल्यांवर अंकुश ठेवण्यात पोलिसांना यश आले आहे.

राष्ट्रीयीकृत, सरकारी आणि सहकार अशा विविध बँकांच्या केवळ १२२ शाखा जिल्ह्यात कार्यान्वित आहेत. म्हणजेच एक लाख लोकसंख्येमागे केवळ ११ शाखा आहेत. लोहखनिजांमुळे उद्योगांना चालना मिळाली असली तरी पायाभूत सुविधेच्या निर्मितीचा प्रवास अद्यापही अपूर्ण आहे.राज्यात सर्वाधिक जंगल गडचिरोली जिल्ह्यात आहे. जिल्ह्याचा ८९ टक्के भूभाग वन क्षेत्रात येतो. त्यातील ६८ टक्के भूभागावर जंगल आहे.

# कापूस, हळद, मक्याला चांगला दर मिळणार?

## » स्मार्ट प्रकल्पाला दिली मोठी जबाबदारी :मुख्यमंत्री फडणवीस

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**ऐन शेतीमाल काढणीच्या काळात बाजारात शेतीमालाची आयात वाढून दरात मोठी पडझड होते. दरातील पडझडीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी महाराष्ट्र बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात पुणे येथे कापूस, हळद आणि मका या पिकांसाठी 'हेजिंग डेस्क' सुरू करण्यात आला आहे. याद्वारे दरातील पडझड रोखून शेतकऱ्यांना योग्य दर मिळण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे.**



राज्याच्या सकल उत्पन्नात कृषीचा वाटा १२ टक्के आहे. मात्र शेती पिकांचे उत्पादन अजूनही नैसर्गिक घटकांवर अवलंबून असते. चांगले उत्पादन होऊनही मालाला योग्य भाव मिळेल का याची चिंता नेहमीच असते. या उपक्रमामुळे शेतकरी त्यांच्या उत्पादनांच्या भविष्यातील किमतीतील चढ – उतारामुळे होणारे नुकसान टाळू शकतात. सेबीचे नियंत्रण असलेली एनसीडीईएक्स संस्थेच्या कमोडिटी मार्केट्स आणि संशोधन संस्थेने (एनआयसीआर) या प्रकल्पासाठी सहकार्य केले आहे. हा उपक्रम कृषी क्षेत्रातील विकासाच्या दिशेने एक महत्वाचा पाऊल आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.शेतकऱ्यांना बाजारपेठेतील ज्ञान मिळण्यासाठी बाजारातील अनिश्चिततेपासून वाचविण्यासाठी एक केंद्रीत समर्पित कृषी 'हेजिंग डेस्क' पुणे येथे स्थापन करण्यात आला आहे. एनसीडीईएक्स आणि स्मार्ट प्रकल्प यांच्यात 'हेजिंग डेस्क' बाबत करार झाला. या कराराचे नाव शेतकरी उत्पादक संघटनासाठी 'हेजिंग डेस्क'ची स्थापना, असे आहे. यामध्ये कापूस, हळद आणि मका ही पिके पिकवणाऱ्या पट्ट्यांमधील शेतकरी उत्पादक संघटना आणि शेतकऱ्यांवर अधिक लक्ष देण्यात येईल.हिंगोली, वाशिम, सांगली, यवतमाळ, अकोला, नांदेड, अमरावती, औरंगाबाद, बीड येथील शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या मार्फत शेतकरी उत्पादक संघटना, क्लस्टर आधारित व्यवसाय संघटनांना तज्ज्ञ सल्ला सेवा कमोडिटी कराराबद्दल माहिती देईल.

### 'हेजिंग डेस्क' म्हणजे काय

बाजार ट्रेंड, पुरवठा – तारणातील बदल जागतिक किमतींवर 'रिअल-टाइम मार्केट इंटेलिजन्स'ची माहिती दिली जाईल. शेतकरी उत्पादक संघटनाना व शेतकऱ्यांना शेताजवळ साठवणूक केंद्रे उभारण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.हेज म्हणजे बाहेरून येणाऱ्या संकटांपासून संरक्षण देण्यासाठी, त्यांना अटकाव करण्यासाठी बांधलेले साधन. भविष्यकाळातील कमी होणाऱ्या किंमतींपासून निर्माण होणारी जोखीम कमी करणे हा हेजिंगचा मुख्य उद्देश आहे. भविष्यकाळातील वाढणाऱ्या किंमतीचा फायदा घेण्यासाठी ऑप्शन ट्रेडिंगचा वापर केला जाऊ शकतो. जागतिक बँकेच्या सल्ल्यानुसार आणि प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार शेतकरी व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी शेतमालाच्या किंमतीतील जोखीम कमी करण्यासाठी वायदे बाजारात सहभागी होण्याकरिता तसेच त्यांना या बाबत मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यासाठी 'हेजिंग डेस्क' सुरु करण्यात आला आहे.

# डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर जपानचा संताप!

## अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यात 3 अणुकेंद्र नष्ट

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इराण-इस्रायलमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेला संघर्ष आता निवळला आहे. अमेरिकेने मध्यस्थी करत या दोन्ही देशातील युद्धसमाप्तीची घोषणा केली. पण या इराण-इस्रायल संघर्षात अमेरिकेनेही एन्ट्री करत इराणमधील ३ आण्विक तळांवर हल्ला करत इराणमधील ३ आण्विक तळ नष्ट केल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला. त्यामुळे हा संघर्ष आणखी मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याची परिस्थिती दिसत असतानाच ट्रम्प यांनी इराण-इस्रायलमध्ये युद्धसमाप्तीची घोषणा केली.**



दरम्यान, अमेरिकेच्या हल्ल्यात इराणच्या आण्विक तळांचं किती नुकसान झालं? अमेरिकेच्या हल्ल्यात आण्विक तळ नष्ट झाले का? ट्रम्प यांनी आण्विक तळ नष्ट केल्याचा दावा खरा आहे का? याबाबत सवाल विचारले जात असतानाच आता राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला आणखी एकदा मोठा इशारा दिला आहे. इस्रायल आणि इराणमधील युद्धसमाप्तीनंतर इराणमध्ये जर आण्विक तळ पुन्हा विकसित करत असल्याचं गुप्तचर यंत्रणेने दाखवलं तर इराणवर कोणताही प्रश्न न करता पुन्हा लष्करी हल्ला करण्याचे आदेश देण्यास मागेपुढे पाहिलं जाणार नसल्याचं डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितलं आहे. एएफपीच्या हवाल्याने इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिलं आहे.दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांना एका पत्रकाराने विचारले की, जर गुप्तचर अहवालात असं आढळून आलं की इराण पुन्हा आण्विक तळ विकसित करत आहेत, तर तुम्ही पुन्हा त्या देशावर हल्ला करण्याचा विचार कराल का?, असा प्रश्न विचारला असता डोनाल्ड ट्रम्प मोजक्या शब्दांत उत्तर दिलं. ते म्हणाले की, "हो, निःसंशयपणे, अगदी कोणताही प्रश्न न करता."अमेरिकेने इराणवर हवाई हल्ले केल्यानंतर अमेरिकन आणि इस्रायली अधिकाऱ्यांनी सांगितलं की, या कारवाईत अमेरिकन स्टेल्थ बॉम्बर्स आणि जीबीयू-५७ बंकर बस्टर बॉम्ब वापरण्यात आले. जे मजबूत भूमिगत टार्गेट करण्यास सक्षम आहेत. अमेरिकेने इराणच्या ३ अणुकेंद्रावर केलेल्या हल्ल्यात फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान हे तीनही आण्विक तळ नष्ट झाल्याचं अमेरिकेने म्हटलं आहे. ट्रम्प यांनी इराण-इस्रायलमध्ये युद्धसमाप्तीची घोषणा केली. पण या हल्ल्याबाबत सांगताना ट्रम्प यांनी इराणवरील हल्ले हिरोशिमा-नागासाकीसारखे होते असं विधान केलं होतं. आता ट्रम्प यांच्या या विधानावरूनच जपानने संताप व्यक्त केला आहे. तसेच ट्रम्प यांनी इराणवरील अमेरिकेच्या हल्ल्यांची तुलना हिरोशिमा आणि नागासाकीच्या अणुबॉम्ब हल्ल्याशी केल्यानंतर जपानने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. नागासाकीच्या महापौरांसह स्थानिक नेत्यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नागासाकीचे महापौर शिरो सुझुकी यांनी ट्रम्प यांच्या टिप्पणीला उत्तर देताना म्हटलं की,"जर ट्रम्प यांच्या टिप्पण्या अणुबॉम्ब टाकण्याचं समर्थन करत असतील तर ज्या शहरावर बॉम्ब टाकण्यात आले.

### हल्ल्यात आण्विक तळ नष्ट

होते त्या शहरासाठी हे अत्यंत खेदजनक आहे", असं त्यांनी म्हटलं. अमेरिकेच्या हल्ल्यात इराणच्या आण्विक तळांचं किती नुकसान झालं? अमेरिकेच्या हल्ल्यात आण्विक तळ नष्ट झाले का? ट्रम्प यांनी आण्विक तळ नष्ट केल्याचा दावा खरा आहे का? याबाबत सवाल विचारले जात असतानाच आता राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला आणखी एकदा मोठा इशारा दिला आहे. इस्रायल आणि इराणमधील युद्धसमाप्तीनंतर इराणमध्ये जर आण्विक तळ पुन्हा विकसित करत असल्याचं गुप्तचर यंत्रणेने दाखवलं तर इराणवर कोणताही प्रश्न न करता पुन्हा लष्करी हल्ला करण्याचे आदेश देण्यास मागेपुढे पाहिलं जाणार नसल्याचं डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितलं आहे. एएफपीच्या हवाल्याने इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिलं आहे.

# दहशतवादी हल्ल्याचा कट उद्ध्वस्त

## पंजाबमध्ये 'आयएसआय'चे मॉड्यूल उघड; तीन जण अटकेत

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पाकिस्तानी गुप्तहेर संस्था 'आयएसआय' समर्थित 'बब्बर खालसा इंटरनॅशनल' (बीकेआय) नावाचे दहशतवादी मॉड्युल उद्ध्वस्त करण्यात पंजाब पोलिसांना यश आले. याप्रकरणात एका अल्पवयीन मुलासह तीन जणांना अटक केल्याची माहिती पोलिसांनी शुक्रवारी दिली. हा गट अमृतसर परिसरात पोलिसांच्या महत्त्वाच्या ठिकाणांना लक्ष्य करून महत्त्वाच्या व्यक्तींची हत्या करण्याचा कट रचत होता, असे राज्याचे पोलीस प्रमुख गौरव यादव यांनी सांगितले.**




'एक्स'वरील संदेशात यादव म्हणाले, 'गुप्तचर यंत्रणेच्या कारवाईअंतर्गत मोहाली येथील 'स्टेट स्पेशल ऑपरेशन सेल'ने पाकिस्तानी 'आयएसआय' समर्थित 'बब्बर खालसा इंटरनॅशनल' नावाचे दहशतवादी मॉड्यूल यशस्वीपणे उद्ध्वस्त केले. ब्रिटनस्थित निशान सिंग आणि पाकिस्तानस्थित दहशतवादी हरविंदर रिंडा हे दोघे संबंधित मॉड्युलचे नेतृत्व करीत होते. या प्रकरणात एका अल्पवयीन मुलासह तीन साथीदारांना अटक करण्यात आली आहे.'कारवाईत दोन हातबॉम्ब, एक पिस्तूल आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. सहजपाल सिंग आणि विक्रमजीत सिंग अशी दोघांची नावे असून, हे दोघेही अमृतसर ग्रामीणमधील रामदास येथील रहिवासी आहेत, तसेच एका अल्पवयीन मुलाचीही ओळख पटली आहे,' असे ते म्हणाले. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता आणि स्फोटक कायद्याच्या विविध कलमांखाली मोहाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.'एक्स'वरील संदेशात यादव म्हणाले, 'गुप्तचर यंत्रणेच्या कारवाईअंतर्गत मोहाली येथील 'स्टेट स्पेशल ऑपरेशन सेल'ने पाकिस्तानी 'आयएसआय' समर्थित नावाचे दहशतवादी मॉड्यूल यशस्वीपणे उद्ध्वस्त केले. ब्रिटनस्थित निशान पाकिस्तानस्थित दहशतवादी हरविंदर रिंडा हे दोघे संबंधित मॉड्युलचे नेतृत्व करीत होते

### दहशतवादी मॉड्युल उद्ध्वस्त

या प्रकरणात एका अल्पवयीन मुलासह तीन साथीदारांना अटक करण्यात आली आहे.'कारवाईत दोन हातबॉम्ब, एक पिस्तूल आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. सहजपाल सिंग आणि विक्रमजीत सिंग अशी दोघांची नावे असून, हे दोघेही अमृतसर ग्रामीणमधील रामदास येथील रहिवासी आहेत, तसेच एका अल्पवयीन मुलाचीही ओळख पटली आहे,' असे ते म्हणाले. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता आणि स्फोटक कायद्याच्या विविध कलमांखाली मोहाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पाकिस्तानी गुप्तहेर संस्था 'आयएसआय' समर्थित 'बब्बर खालसा इंटरनॅशनल' (बीकेआय) नावाचे दहशतवादी मॉड्युल उद्ध्वस्त करण्यात पंजाब पोलिसांना यश आले. याप्रकरणात एका अल्पवयीन मुलासह तीन जणांना अटक केल्याची माहिती पोलिसांनी शुक्रवारी दिली.

# आता स्थगिती नको, निर्णय हवा

राज्यामध्ये सध्या हिंदी विरुद्ध मराठी यावरून वातावरण चांगलंच तापलं आहे. राज्य सरकारने नवीन शिक्षण धोरणातील त्रिभाषा सूत्रानुसार महाराष्ट्रामध्ये पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याविरोधात शिक्षण, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामधून विरोध अधिकच तीव्र झाला आहे. अनिवार्य हा शब्द काढण्यात आला असला, तरी हिंदी ही पर्यायी भाषा आणल्यामुळे विरोधकांनी टीकेची झोड उठवली आहे.हिंदी भाषा सक्तीबद्दलच्या निर्णयाबद्दल महाराष्ट्र



नवनिर्माण सेना आधीपासूनच आक्रमक असल्याचे पाहायला मिळत आहे. अशातच राज ठाकरे यांनी काल (२६ जून) रोजी पत्रकार परिषद घेत मुंबईतील गिरगाव चौपाटी येथे मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा केली. राज ठाकरे यांनी ५ जुलै, शनिवार रोजी मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली असून अनेकांनी या मोर्चात सहभागी व्हावं असं आवाहनही केलं आहे.मराठी अभिनेत्री तेजस्विनी पंडीतनेही या मोर्चात सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे. तेजस्विनी पंडीत सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. सोशल मीडियाद्वारे ती तिची राजकीय आणि सामाजिक मतं शेअर करत असते. तसंच ती राज ठाकरेंबद्दलच्या अनेक पोस्टही शेअर करत असते. अशातच तिने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या मोर्चात सहभागी होण्यासाठीची सोशल मीडिया पोस्ट शेअर केली आहे.

# श्रद्धा कपूरची पोस्ट चर्चेत

लोकप्रिय अभिनेत्री श्रद्धा कपूर हिनं तिच्या सहज सुंदर अभिनयानं प्रेक्षकांच्या मनात स्वत:चं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. अभिनेत्रीनं आजवर अनेक सुपरहिट चित्रपटांतून काम करीत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. श्रद्धा कपूरचा चाहतावर्गही खूप मोठा आहे. सोशल मीडियावर तिचे दशलक्षामध्ये फॉलोअर्स आहेत. तर, सोशल मीडियावरून अभिनेत्री स्टोरी, पोस्ट शेअर करीत प्रेक्षकांच्या संपर्कात राहत असते. श्रद्धा तिच्या पोस्टमधून तिच्या दैनंदिन आयुष्यातील घडामोडी, तसेच नवीन अपडेट शेअर करीत असते. श्रद्धा ही तिच्या साध्या राहणीमानासाठी ओळखली जाते. त्यामुळे ती प्रेक्षकांना आपलीशी वाटते. सोशल मीडियावर तिचे अनेक रील व्हायरल होत असतात. अशातच अभिनेत्रीने नुकतीच एक पोस्ट शेअर केली आहे. तिने या पोस्टमधून कविता लिहिलेली पाहायला मिळतेय.श्रद्धा कपूरने इन्स्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करीत यामधून प्रेमावर आधारित कविता लिहिलेली पाहायला मिळतेय. तिने लिहिलं आहे की,दरम्यान, श्रद्धा कपूरच्या कामाबद्दल बोलायचं झालं, तर ती नुकतीच 'स्त्री २' या चित्रपटातून झळकली होती. तिची मुख्य भूमिका असलेल्या 'स्त्री' चित्रपटाच्या यशानंतर या चित्रपटाचा

“जब तुम अकेले हो,
मैं तुम्हारे पास बैठ जाऊंगी
जब तुम उदास हो
मैं तुम्हे बाहों में भर लूंगी
मुझे पता हैं तुम खो जाते हों
मुझे पता हैं तुम भाग जाते हों
लेकिन मैं तुम्हें ढुंड लूंगी
और तुम्हे थाम लूंगी”

जेव्हा तू एकटा असशील,
तेव्हा मी तुझ्याबरोबर असेन
जेव्हा तू उदास असशील
तेव्हा मी तुला मिठीत घेईन
मला माहीत आहे
तू मधेच हरवतोस,
पळून जातोस,
पण मी तुझा शोध घेईन

अभिनेत्रीने ही संदर कविता तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून शेअर केली आहे.दुसरा भाग प्रदर्शित झाला होता. या चित्रपटालासुद्धा प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. यापूर्वी अभिनेत्री रणबीर कपूरसह 'तू झूठी में मक्कार' या चित्रपटात झळकली होती. यातील रणबीर व श्रद्धा यांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री प्रेक्षकांना खूप आवडली होती. या चित्रपटानंसुद्धा बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली होती. त्यानंतर अभिनेत्री 'छावा' चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांच्या आगामी चित्रपटातून मुख्य भूमिकेत झळकणार असल्याचं म्हटलं जात आहे.लोकप्रिय अभिनेत्री श्रद्धा कपूर हिनं तिच्या सहज सुंदर अभिनयानं प्रेक्षकांच्या मनात स्वत:चं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. अभिनेत्रीनं आजवर अनेक सुपरहिट चित्रपटांतून काम करीत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. श्रद्धा कपूरचा चाहतावर्गही खूप मोठा आहे. सोशल मीडियावर तिचे दशलक्षामध्ये फॉलोअर्स आहेत. तर, सोशल मीडियावरून अभिनेत्री स्टोरी, पोस्ट शेअर करीत प्रेक्षकांच्या संपर्कात राहत असते. श्रद्धा तिच्या पोस्टमधून तिच्या दैनंदिन आयुष्यातील घडामोडी, तसेच नवीन अपडेट शेअर करीत असते. श्रद्धा ही तिच्या साध्या राहणीमानासाठी ओळखली जाते. त्यामुळे ती प्रेक्षकांना आपलीशी वाटते. सोशल मीडियावर तिचे अनेक रील व्हायरल होत असतात. अशातच अभिनेत्रीने नुकतीच एक पोस्ट शेअर केली आहे. तिने या पोस्टमधून कविता लिहिलेली पाहायला मिळतेय.श्रद्धा कपूरने इन्स्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करीत यामधून प्रेमावर आधारित कविता लिहिलेली पाहायला मिळतेय.



लोकप्रिय अभिनेत्री ज्ञानदा रामतीर्थकर सध्या 'लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेतून मुख्य भूमिकेत पाहायला मिळत आहे. या मालिकेतील तिच्या भूमिकेला प्रेक्षकांची पसंती मिळत आहे. ज्ञानदा अभिनयासह सोशल मीडियावरही बरीच सक्रिय असते. ती तिच्या यूट्यूब चॅनेलवरील ब्लॉगमार्फत सेटवरील अपडेट, गमती-जमती चाहत्यांसह शेअर करत असते. ज्ञानदाने गुरुवारी (२६ जून) तिचा वाढदिवस साजरा केला. यानिमित्त अनेकांनी तिला सोशल मीडियामार्फत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या होत्या. तिच्या फॅन्स कल्बने सोशल मीडियावर तिचे रील बनवत पोस्ट केले होते. यासह ज्ञानदाच्या 'ठिपक्यांची रांगोळी' या मालिकेतील सहकलाकारांनीही तिला सोशल मीडियामार्फत पोस्ट करत शुभेच्छा दिल्या होत्या. अशातच काल 'लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेच्या सेटवरही अभिनेत्रीचा वाढदिवस साजरा करण्यात आला.ज्ञानदाच्या वाढदिवसानिमित्त मालिकेच्या सेटवर केक आणण्यात आला होता. यावेळी तिने सहकलाकारांसह केक कट करत तिचा वाढदिवस साजरा केला. ज्ञानदा या मालिकेत काव्या हे पात्र साकारत आहे. तिच्यासह यामध्ये मृणाल दुसानिस, विजय आंदलकर, विवेक सांगळे हे कालाकार मुख्य भूमिकेत पाहायला मिळतात. हे सर्व कलाकार सेटवर शूटिंग नसताना एकमेकांबरोबरचे अनेक व्हिडीओ, रील सोशल मीडियावर पोस्ट करत असतात.ज्ञानदा रामतीर्थकर ही छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री आहे. सोशल मीडियावर तिचा खूप मोठा चाहतावर्ग आहे. तिने आजवर अनेक गाजलेल्या मालिकांमध्ये काम केलं आहे. 'लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेआधी ती 'ठिपक्यांची रागोळी' या मालिकेत मुख्य भूमिकेत झळकली होती. तिच्या या मालिकेलासुद्धा प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. यामध्ये तिने साकारलेली अपूर्वा ही भूमिका खूप गाजली होती.ज्ञानदाने 'शतदा प्रेम करावे', 'सख्या रे', 'झिंदगी नॉट आऊट' यांसारख्या मालिकेत मुख्य भूमिका साकारल्या आहे. परंतु, 'ठिपक्यांची रांगोळी' या मालिकेतून ती खऱ्या अर्थाने प्रसिद्धीझोतात आली. यासह अभिनेत्री मालिकांव्यतिरिक्त वेब सीरिज आणि चित्रपटांमध्येही काम करते. लवकरच तिचा एक नवीन चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.लोकप्रिय अभिनेत्री ज्ञानदा रामतीर्थकर सध्या 'लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेतून मुख्य भूमिकेत पाहायला मिळत आहे. या मालिकेतील तिच्या भूमिकेला प्रेक्षकांची पसंती मिळत आहे.


# 'असा' साजरा झाला ज्ञानदा रामतीर्थकरचा वाढदिवस

# देश माझ्या लेकीपेक्षा महत्त्वाचा!

## इंग्लंड दौऱ्यापूर्वी केएल राहुलचा इंडियासाठी मोठा त्याग

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारताचा नव्या कसोटी संघाची सुरूवात अपेक्षेप्रमाणे झाली नाही. शुबमन गिलच्या नेतृत्त्वाखालील भारतीय संघाचा इंग्लंडने पहिल्याच कसोटीत ५ विकेट्सने पराभव केला. ५ सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात इंग्लंडने ०-१ ने आघाडीवर आहे. तर या सामन्यात भारताने पाच शतकं झळकावली. हेडिंग्ले कसोटीतील प्रमुख कामगिरी करणाऱ्या केएल राहुलने दुसऱ्या डावात शतक झळकावले. दरम्यान केएल राहुलच्या कोचने त्याच्याबद्दल मोठा खुलासा केला आहे.**





राहुल संघाच्या आधी इंग्लंडमध्ये पोहोचून सराव करत होता. या मालिकेपूर्वी इंग्लंड लायन्सविरुद्धच्या शेवटच्या अनधिकृत कसोटीत त्याने इंडिया अ संघाकडून शतकही झळकावले होते. आता त्याचा आयपीएल संघ दिल्ली कॅपिटल्सचे मुख्य प्रशिक्षक हेमांग बदानी यांनी या मालिकेसाठी त्याने दिलेल्या त्यागाबद्दल माहिती दिली आहे. हेमांग बदानी यांनी टाईम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत केएल राहुलबद्दल वक्तव्य केलं. केएल राहुलला इंग्लंडला लवकर जायचं होतं आणि इंग्लंड लायन्सविरुद्ध शेवटचा अनधिकृत कसोटी सामना खेळायचा होता जेणेकरून त्याला थोडा सराव करता येईल हे मला खूप आवडलं. त्याने असंही सांगितलं की त्याची लेक इवारा लहान असल्याने यंदा इंग्लंड दौऱ्यासाठी त्याच्याबरोबर जाणार नाहीये. त्यामुळे राहुलचा हा एक मोठा निर्णय होता.हेमांग बदानी म्हणाले, “मला त्याच्याबाबतीत एक गोष्ट आवडली. तो म्हणाला, मला सराव सामना खेळायचा आहे. त्याचं शतक विसरा, ते शतक त्याने नंतर केलं.

पण देशाप्रती त्याची असलेली निष्ठा, ती महत्त्वाची आहे. इंग्लंडला लवकर जाऊन तिथे सराव करत दौऱ्यासाठी त्याला तयारी करायची होती. बरं तो नुकताच बाबा झाला आहे, हे विसरून चालणार नाही आणि त्याची मुलगीही त्याच्याबरोबर तिथे नसणारे. त्यावर राहुल म्हणाला, माझ्या मुलीआधी देश महत्त्वाचा आहे. हा खूप मोठा निर्णय आहे.”“तो सहज म्हणू शकला असता की, मी सराव सामना खेळणार नाहीये, मी थेट कसोटी सामना खेळेन, पण त्याने तसं केलं नाही”, असं बदानी पुढे म्हणाले.इंग्लंड दौऱ्यावर जाण्यापूर्वी राहुलचं वक्तव्य काय होतं हे, कोच बदानी यांनी सांगितलं. “राहुलने इंग्लंड दौऱ्यावर जाण्यापूर्वी मला सांगितलं होतं. मला या संघाची काळजी आहे आणि मला इंग्लंडला लवकर जायचं आहे. त्याच्या डोळ्यात आणि त्याच्या बोलण्यात मला संघासाठी योगदान देण्याची भूक दिसत होती. रोहित आणि विराटच्या अनुपस्थितीत तो सर्वात वरिष्ठ फलंदाज ठरतो आणि त्याने ही भूमिका खरोखरच उत्तम प्रकारे बजावली आहे.”, असं बदानी यांनी सांगितलं.केएल राहुलने पहिल्या कसोटीच्या दोन्ही डावात उत्कृष्ट कामगिरी करत संघाला चांगली सुरूवात करून दिली. राहुल पहिल्या डावात ४२ धावा करत बाद झाला. तर दुसऱ्या डावात त्याने शतक झळकावत भारताचा डाव सावरला.राहुल संघाच्या आधी इंग्लंडमध्ये पोहोचून सराव करत होता. या मालिकेपूर्वी इंग्लंड लायन्सविरुद्धच्या शेवटच्या अनधिकृत कसोटीत त्याने इंडिया अ संघाकडून शतकही झळकावले होते.

### राहुलचा हा एक मोठा निर्णय

आता त्याचा आयपीएल संघ दिल्ली कॅपिटल्सचे मुख्य प्रशिक्षक हेमांग बदानी यांनी या मालिकेसाठी त्याने दिलेल्या त्यागाबद्दल माहिती दिली आहे.हेमांग बदानी यांनी टाईम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत केएल राहुलबद्दल वक्तव्य केलं. केएल राहुलला इंग्लंडला लवकर जायचं होतं आणि इंग्लंड लायन्सविरुद्ध शेवटचा अनधिकृत कसोटी सामना खेळायचा होता जेणेकरून त्याला थोडा सराव करता येईल हे मला खूप आवडलं. त्याने असंही सांगितलं की त्याची लेक इवारा लहान असल्याने यंदा इंग्लंड दौऱ्यासाठी त्याच्याबरोबर जाणार नाहीये. त्यामुळे राहुलचा हा एक मोठा निर्णय होता.हेमांग बदानी म्हणाले, “मला त्याच्याबाबतीत एक गोष्ट आवडली. तो म्हणाला, मला सराव सामना खेळायचा आहे. त्याचं शतक विसरा, ते शतक त्याने नंतर केलं.

# पंचांचे निर्णय ऑस्ट्रेलियाच्या बाजूने

## थर्ड अंपायरच्या वादग्रस्त निर्णयावरून मोठा गदारोळ

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिज यांच्यात कसोटी मालिका खेळवली जात आहे. ही मालिका वेस्ट इंडिजच्या घरच्या मैदानावर असून ऑस्ट्रेलियाचा संघ पहिल्या डावात १८० धावांवर सर्वबाद झाला. तर दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजचा संघ फक्त १८० धावाच करू शकला.**






तर दुसऱ्या डावात आता ऑस्ट्रेलिया संघाने पंचांच्या निर्णयाच्या जोरावर आघाडी घेतली आहे.बार्बाडोसमधील केन्सिंग्टन ओव्हल येथे सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजवर ८२ धावांची एक छोटीशी पण महत्त्वाची आघाडी मिळवली, कारण पंचांच्या वादग्रस्त निर्णयांच्या मालिकेने या सामन्याला रोमांचक वळण दिले. कसोटीच्या दुसऱ्या दिवशी वेगवान गोलंदाजांनी वर्चस्व गाजवलं आणि फलंदाजांचा धावा करण्यासाठी कस लागला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावातील १८० धावांच्या प्रत्युत्तरात वेस्ट इंडिजने ४ बाद ५७ धावांसह दुसऱ्या दिवशी सुरूवात केली. सकाळच्या सत्रात कर्णधार रोस्टन चेस आणि पुनरागमन करणारा कसोटी फलंदाज शे होप यांच्यात ६७ धावांची भागीदारी झाली, ज्यामुळे यजमान संघ पहिल्या डावात आघाडी मिळविण्याच्या दिशेने अग्रेसर होते. परंतु लंचच्या दरम्यान तिसऱ्या पंचांच्या दोन वादग्रस्त निर्णयांमुळे सामन्यात ऑस्ट्रेलियाने पुनरागमन केलं.वेस्ट इंडिजचा कर्णधार रोस्टन चेस कमिन्सच्या गोलंदाजीवर ४४ धावांवर पायचीत झाला. त्याने लगेचच लगेचच रिव्ह्यूची मागणी केली आणि त्याला खात्री होती की चेंडू बॅटला लागून पॅडला लागला आहे. पण तिसऱ्या पंचांनीही त्याला रिव्ह्यू पाहिल्यानंतर बाद दिलं. पंचांच्या निर्णयामुळे रोस्टन चेस १०८ चेंडूत ५ चौकारांसह ४८ धावा करत बाद झाला. रोस्टन चेसच्या विकेटनंतर काही वेळातच चार वर्षांनंतर पहिलाच कसोटी सामना खेळणाऱ्या शे होपला ब्यू वेबस्टरने ॲलेक्स कॅरीच्या हाती झेलबाद केलं. ऑस्ट्रेलियन यष्टीरक्षकाने पुढे जाऊन एका हाताने झेल घेतला. टेलिव्हिजन रिप्लेवरून असे दिसून आले की चेंडू मैदानावर आदळला असावा, परंतु थर्ड अंपायर एड्रियन होल्डस्टॉकने ऑस्ट्रेलिया संघाच्या बाजूने निकाल दिला.

होप ४८ धावांवर बाद झाल्याने विंडिजचा संघ बॅकफूटवर गेला. लंचब्रेकपूर्वी पाच बाद १३५ धावांवरून यजमान संघ १९० धावांवर गारद झाला आणि १० धावांची आघाडी घेतली. कमिन्स आणि वेबस्टर यांनी चांगली गोलंदाजी केली तर स्टार्क आणि लायनने त्यांना चांगली साथ देत वेस्ट इंडिज संघाला गुंडाळलं.

### शे होप खरंच झेलबाद होता का?

ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव पहिल्या डावासारखाच सुरू झाला आणि संघाने झटपट विकेट गमावले. उस्मान ख्वाजाला अल्झारी जोसेफने १५ धावांवर पायचीत केलं, त्यानंतर सॅम कोन्स्टास पाच धावांवर बाद झाला. वेस्ट इंडिजच्या खेळाडूंनी संघाचा वेगवान गोलंदाज शमार जोसेफच्या गोलंदाजीवर तब्बल ५ झेल सोडले.

महाईन्यूज ™
स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
ePaper
। शनिवार।
। दि. 28 जून 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## भाजपा आ. महेश लांडगे यांचा पाठपुरावा

# “इको टुरिझम पार्क” च्या कामाला गती!

## राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांचे आश्वासन

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड शहरातील पर्यटन क्षेत्राला चालना देणारा आणि शहराच्या वैभवात भर घालणारा मौजे डुडुळगाव येथील प्रस्तावित “इको टुरिझम पार्क” च्या कामाला गती देण्यात येणार आहे. त्यासाठी राज्याच्या वन विभागाकडून तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे आवाश्वासन राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांनी दिली.**



वन विभागाशी संबंधित विविध मागण्यांसाठी वन मंत्री नाईक यांनी सविस्तर बैठक घ्यावी, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली होती. त्यानुसार, पुण्यात शुक्रवारी बैठक झाली. यावेळी महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, शोमिता विश्वास, नरेश झुरमुरे, विवेक खाडेकर, महादेव मोहिते असे विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आमदार लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील मौजे डुडुळगाव येथे राज्य सरकारच्या वन विभागाच्या माध्यमातून “इको टुरिझम पार्क” विकसित करण्यात येणार आहे. यासाठी निधी उपलब्ध व्हावा. तसेच, आण्णाभाऊ साठेनगर वसाहतीसाठी पायाभूत सुविधा उभारणीसाठी परवानगी मिळावी. मंजूर विकास योजनेतील रस्त्यासाठी भूखंड हस्तांतरण आणि मौजे मोशी, गट क्र. ६४६ मधील प्रस्तावित २२०/३३ के.व्ही. उपकेंद्रासाठी अभिप्राय मिळावा, अशी मागणी केली.

डुडुळगाव येथील वन विभागाच्या मालकीच्या भूखंडावर “इको टुरिझम पार्क” उभारण्याचा प्रस्ताव आहे. सदर प्रकल्पासाठी अंदाजे 2.62 कोटी रुपये निधीची आवश्यकता असून, तो वन विभाग तसेच जिल्हा वार्षिक योजना 2025-26 अंतर्गत मागविण्यात आलेला आहे. संबंधित प्रस्ताव सध्या प्रलंबित आहे. या प्रकल्पाच्या त्वरित अंमलबजावणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध होणार आहे.

> ‘इको टुरिझम पार्क’साठी तात्काळ निधी उपलब्ध करण्यात येईल. महानगरपालिकेच्या प्रस्तावांतर आगामी 15 दिवसांत निर्णय घेण्यात येईल, तसेच आण्णाभाऊ साठेनगर वसाहतीसाठी पायाभूत सुविधा उभारणीसाठी वन विभागाचा अडथळा येणार नाही, असे आश्वासन वन मंत्री गणेश नाईक यांनी दिले आहे. त्यामुळे वन विभागाशी संबंधित कामांना गती मिळेल, असा विश्वास आहे.
> –**महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.



# नागरी समस्या सोडवण्याच्या दृष्टीने नियोजन करा!

## PMRDA: राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी घेतली बैठक

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पुणे शहर परिसरात नागरी समस्या दिवसेंदिवस वाढत असून त्या सोडवण्याच्या दृष्टीने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नियोजन करावे, असे निर्देश राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी दिले. गुरुवारी (दि.२६) पीएमआरडीए कार्यालयात त्यांनी आढावा बैठक घेतली. यावेळी महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी पीएमआरडीएअंतर्गत सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित विकास कामांबद्दल त्यांना सविस्तर माहिती दिली.**



नागरी सुविधा आणि वाहतूक कोंडीमुळे पुणेकर हैराण आहे. त्यामुळे या समस्येकडे अधिक लक्ष देण्याची गरज असल्याचे राज्यमंत्री मिसाळ यांनी बैठकीत स्पष्ट केले.

त्या अनुषंगाने महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी सध्या सुरू असलेल्या विविध विकास कामांसह मिसिंग लिंक, औद्योगिक कनेक्टिव्हिटी, पर्यटन व धार्मिक स्थळांचा विकास, अर्बन ग्रोथ सेंटर, रिंग रोड कनेक्टिव्हिटी यासह विविध भागात सुरू असलेल्या रस्ते विकास कामांसह इतर प्रकल्प आणि योजनांबाबत राज्यमंत्री यांना सविस्तर माहिती दिली.

या बैठकीला पीएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, पोलीस अधीक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे, विकास परवानगी व नियोजन विभागाचे संचालक सुनील मरळे, मुख्य अभियंता रिनाज पठाण, सह आयुक्त पूनम मेहता, वित्तीय नियंत्रक पद्मश्री तळदेकर यांच्यासह सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### 150 दिवसांच्या कार्यक्रमाचे नियोजन...

पुणे शहराच्या पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी आखण्यात आलेल्या विविध योजना, रस्ते विकासाचे नियोजन, गत काही वर्षांत राबविण्यात आलेल्या प्रकल्पांची सध्यस्थिती तसेच पुणे रिंग रोडच्या प्रगतीवर चर्चा झाली. शहरातील विविध भागांत प्रभावी कनेक्टिव्हिटी निर्माण करण्यासह मुख्यमंत्री - 100 दिवसांच्या उद्दिष्टांच्या यशस्वी साध्यतेसह पुढील 150 दिवसांच्या कार्यक्रमाचे नियोजन व त्यातून साध्य होणाऱ्या उद्दिष्टांवरही यावेळी चर्चा करण्यात आली.



## भूसंपादनाअभावी शेतकऱ्यांसह नागरिकांना अनेक अडचणी

# वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी भूसंपादन!

### प्रस्ताव पाठवा : महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांचे एमआयडीसीला निर्देश

।पिंपरी- चिंचवड ।प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**वाहतूक कोंडीमुळे वाहनधारकांसह नागरिक हैराण असून हिंजवडी, मान, म्हळुंगे, मारुंजी येथील रस्त्याच्या भूसंपादनाअभावी शेतकऱ्यांसह नागरिकांना अनेक अडचणी येत आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणा एमआयडीसीने तातडीने पावले उचलत याबाबत आपला प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवण्याचे निर्देश, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिले. याबाबत आमदार शंकर मांडेकर यांच्यासह संबंधित शेतकरी आणि प्रशासकीय यंत्रणेच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत डॉ. म्हसे यांनी गुरुवारी आकुर्डी कार्यालयात आढावा बैठक घेतली.**




मान रोडसह इतर काही महत्त्वाच्या रस्त्यासंदर्भात एमआयडीसीकडून भूसंपादनाची प्रक्रिया रखडल्याने वाहनधारकांसह नागरिकांना या मार्गावरून प्रवास करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.त्यामुळे संबंधित मार्गादरम्यान किती शेतकऱ्यांच्या जमिनीचे संपादन आवश्यक आहे, यासंबंधी तातडीने अहवाल तयार करत तसा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास पाठवत तातडीने SLR यांच्याकडून मोजणी करून घेण्याचे निर्देश महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना दिले. या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांचा संभ्रम दूर होऊन रहदारीचा प्रश्न निकाली निघणार आहे.

या भूसंपादन प्रक्रियेदरसंबंधी संबंधित शेतकऱ्यांचे म्हणणे जाणून घेत त्यांना नियमानुसार टीडीआर किंवा भूसंपादनाचा मोबदला द्यावा लागणार आहे. यादरम्यान शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे निराकरण प्रशासकीय यंत्रणेमार्फत करण्यात आले. आगामी काळात या भागातून ४५ मीटर रस्त्याची आखणी होणार असल्याने गावालगतची अनेक घरे बाधित होतील. त्यामुळे गाव हद्दीत ४५ मीटर ऐवजी २४ मीटरचे रस्ते करावेत, अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी केली.

पर्यायी रस्त्याचे नियोजन वाहतूक कोंडी सोडवण्याच्या दृष्टीने या भागातील पर्यायी रस्त्यांसह अंतर्गत नवीन रस्ते पीएमआरडीएअंतर्गत मंजूर झाले असून त्यांचे देखील काम लवकरच सुरू होणार आहे. या बैठकीला आमदार शंकर मांडेकर, महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, विकास परवानगी व नियोजन विभागाचे संचालक सुनील मरळे, मुख्य अभियंता रिनाज पठाण, जमीन व मालमत्ता विभागाचे हिम्मत खराडे यांच्यासह एमआयडीसी, सार्वजनिक बांधकाम

#### पीएमआरडीएकडून शेतकरीहिताचे पाऊल

हिंजवडी-माण मुख्य रस्त्याच्या रुंदीकरण प्रकल्प आणि जमीन अधिग्रहणाशी संबंधित शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर या बैठकीत जमिनीच्या TDR (TRANSFERABLE DEVELOPMENT RIGHTS) प्रक्रियेतील अडचणी, भूखंडांच्या योग्य मूल्यांकनाबाबतच्या अपेक्षा, तसेच नुकसानभरपाई संदर्भातील तक्रारी यावर चर्चा करण्यात आली. बैठकीत प्रशासनाने शेतकऱ्यांचे हक्क आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी त्वरित कार्यवाही करत रस्ते रुंदीकरण प्रकल्पाच्या प्रक्रियेमुळे कोणत्याही शेतकऱ्याला आर्थिक किंवा सामाजिक नुकसान होणार नाही, याची संबंधित अधिकाऱ्यांनी खात्री करूनच पुढील प्रक्रिया करावी, असे निर्देश महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिले.

# व्ही. के. माटे हायस्कूलमध्ये काव्यवाचनाचा उत्सव

### शिक्षण विश्व: महाकवी कालिदास दिन व संस्कृत दिनानिमित्त कार्यक्रम

।पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाकवी कालिदास दिन व संस्कृत दिनानिमित्त व्ही. के. माटे हायस्कूल, श्रीधरनगर, चिंचवड येथे एक भव्य काव्यवाचन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. चंद्रकिरण काव्य मंडळ, तळेगाव दाभाडे यांच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमात पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी भाग घेतला.**



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मोरया शिक्षण संस्थेचे तहयात विश्वस्त व खजिनदार श्री. रणजीत सावंत, कार्यकारिणी सदस्या व सुप्रसिद्ध कवयित्री सौ. प्रतिभाताई कुलकर्णी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोरया शिक्षण संस्थेच्या कार्यवाह व प्राचार्या मान. सौ. इंद्रायणी माटे-पिसोळकर होत्या.

विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनीही आपल्या स्वरचित कविता सादर करून आपली काव्यप्रतिभा सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षिका सौ. मैत्रेयी राजे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व स्वागत सौ. पुजारी मॅडम यांनी, सूत्रसंचालन श्री. हनुमंत हुचगोळ सरांनी तर आभारप्रदर्शन श्री. गिरी गोसावी सरांनी केले.

या कार्यक्रमास मोरया शिक्षण संस्थेचे उपमुख्याध्यापक श्री. दिलीप कुमावत तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात सौ. इंद्रायणी माटे-पिसोळकर यांनी विद्यार्थ्यांच्या कविता सादरीकरणाचे विशेष कौतुक केले. "या कार्यक्रमातून प्रेरणा घेऊन उद्याचे महाकवी घडतील," असे त्यांनी अभिमानपूर्वक सांगितले.

#### राष्ट्राभिमान जागवला...

या काव्यवाचन सोहळ्यात चंद्रकिरण काव्य मंडळाचे ज्येष्ठ कवी व कवयित्री – सौ. मेघा खळदे, सौ. ज्योती मुंगी, सौ. मीनाक्षी भरड, श्री. सतीश साठे आणि श्री. जयवंत पवार – यांनी विविध सामाजिक विषयांवरील कविता तसेच क्रांतिकारकांवरील स्फूर्तिदायक रचना सादर करून रसिकांची मनं जिंकली. पोखरण अणुचाचणीवर आधारित पोवाड्याने उपस्थितांमध्ये राष्ट्राभिमान जागवला.


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241



Not just education, but
**Personality transformation.**

ADMISSIONS OPEN for 2025-26

- CBSE curriculum
- Initiatives like 'Read-to-Lead'
- Tradition of 100% result

Gayatri English Medium School & Junior College, Charholi

95277 64646 / 77967 67292